
जैन दर्शन १

वैश्विक जैन यात्रास्थलदर्शन




डॉ. श्रेणिक सुरेश सरडे




जैन दर्शन

(भाग - १)

डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ९ जून २०२५

लेखकाचा परिचय





मी डॉ. श्रेणिक सुरेश सरडे, राहणार कवठे पिराण तालुका ः मिरज. जिल्हा ः सांगली. माझे पदवी आणि पदव्युतर शिक्षण हे इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मध्ये झाले आहे. मी माझे डॉक्टरेट हे शिवाजी विदयापिठात इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मध्ये २०२४ ला पुर्ण केले आहे. मी १६ वर्षे झाले अभियांत्रिकी विदयालयात प्राध्यापक म्हणून काम करत आहे. ई साहित्यमध्ये माझे भयान रात्र, जैन धर्म आणि जैन धर्म (भाग - १) हे पुस्तक प्रकाशित झाले आहेत.

पत्ता ः कवठे पिराण

तालुका ः मिरज , जिल्हा ः सांगली (४१६४१७)

मोबाइल नंबर ः ९०११४६४८३८


जैन धर्म
श्रेणिक सुरेश सरडे
जैन धर्म
अहिंसा
परस्परोपग्रहो जीवानाम्


जैन धर्म
श्रेणिक सरडे

प्रस्तावना

जैन दर्शन (भाग - १) या पुस्तकात जैन धर्मातील धार्मिक स्थळांची माहिती दिली आहे. याची सर्वांना माहिती व्हावी हा यामागचा उद्देश आहे. या पुस्तका मध्ये मानस्तंभ, भगवान बाहुबली आणि त्यांचा धार्मिक स्थळाविषयी सविस्तर माहिती दिली आहे. जैन समाजाचे महत्वाचे तिर्थस्थळ सम्मेद शिखरजी बद्दल सविस्तर माहिती दिली आहे. या पुस्तकामध्ये जैन धर्माच्या विविध राज्यातील प्राचीन धार्मि क स्थळा बद्दल माहिती दिली आहे.

डॉ. श्रेणिक सुरेश सरडे

पत्ता ः कवठे पिराण

तालुका ः मिरज. जिल्हा ः सांगली (४१६४१७)

मोबाइल नंबर ः ९०११४६४८३८

१ . मानस्तंभ

मानस्तम्ब ला मानस्तंभ असेही म्हटले जाते . ही जैन स्थापत्य आणि धार्मिक व्यवहारातील एक महत्त्वपूर्ण रचना आहे . मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी श्रावक आणि श्राविकांना आपला अहंकार सोडण्याची आठवण करून देण्यासाठी जैन मंदिरासमोर ठेवलेला हा नम्रतेचा स्तंभ आहे . मानस्तंभ हा शब्द दोन संस्कृत शब्दांपासून तयार झाला आहे .

१) मन ः मनातील अभिमान, अंहकार

२) स्तंभ (स्तम्भ) ः स्तंभ

अशाप्रकारे मानस्तंभ हा अभिमान आणि अंहकाराच्या विनाशाचे प्रतीक आहे . जे श्रावक आणि श्राविकांना तीर्थंकरांसमोर उभे राहण्यापूर्वी नम्रता जोपासण्यास प्रोत्साहित करते .

आदर्श मानस्तंभ हा ८ विभागामध्ये विभागला आहे .

१) खालून सुरूवात

२) प्लॅटफॉर्म १ (सम्यकदर्शन)

३) प्लॅटफॉर्म २ (सम्यकज्ञान)

४) प्लॅटफॉर्म २ (सम्यक चारित्र)


५) पदम (कमळाच्या स्वरूपातील आधार)

६) पिलर (स्तंभ)

७) पोडियम (वेदी)

८) शिखर

९) कलश



मानस्तंभ ही एक गुंतागुंतीची रचना आहे ज्याचे आठ भाग आहेत.प्रत्येक भाग आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानात्मक पैलूचे प्रतिनिधित्व करते. मानस्तंभ हा प्लॅटफॉर्म १ (सम्यकदर्शन) पासून सुरू होतो जिथे साधक योग्य दृष्टी जोपासतो. प्लॅटफॉर्म २ (सम्यकज्ञान) खरा ज्ञानाचा मार्ग प्रदान करते तर प्लॅटफॉर्म २ (सम्यक चारित्र) आध्यात्मिक विकासाचा पाया म्हणून नीतिमत्ता आणि नैतिकतेवर भर देते. ही रचना आध्यात्मिक प्रवासाचे प्रतीक आहे. ज्ञानप्राप्तीसाठी प्रत्येक टप्प्याचे महत्त्व अधोरेखित करते. पदम या भव्य वास्तूचा भक्कम आधार म्हणून काम करते. कमळाची शोभा आणि पावित्र दर्शविते. आध्यात्मिक जागृती आणि प्रबोधनाचे प्रतीक आहे. पदमच्या वर उठून जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य आणि स्थैर्य दर्शविणारा स्तंभ आहे जो श्रावक आणि श्राविकांना त्यांच्या श्रद्धा आणि मूल्यांवर ठाम राहण्याचे आवाहन करतो. व्यासपिठावर (वेदी) चढून साधकाला समर्पण आणि भक्तीचे प्रतीक म्हणून आपली साधना व प्रसाद उंचावण्यास प्रोत्साहन दिले जाते. शेवटी मानस्तंभाचे शिखर गाठणे हे आध्यात्मिक उत्क्रांतीचे प्रतीक आहे. जिथे साधकाला चैतन्य आणि साक्षात्काराची सर्वोच्च अवस्था प्राप्त करण्याची इच्छा असते. कलश या दिव्य रचनेला मुकुट घालतो. परिपूर्णता आणि दैवी उपस्थिती दर्शवितो.

२ . भगवान बाहुबली

श्री भगवान ऋषभदेव जी यांना १०० पुत्र आणि २ पुत्री होते. त्यामध्ये भरत हे ज्येष्ठ पुत्र होते. भरत ला बाहुबली, वृषभसेन, अनंतविजय, अनंतविर्य, अच्युत, बरवीर असे ९९ भाऊ आणि ब्राह्मी व सुंदरी अश्या दोन बहिणी होत्या.

जेव्हा भगवान ऋषभदेवानी मुनि होण्याचा निश्चय केला त्यावेळी त्यांनी आपले साम्राज्य आपल्या १०० पुत्रामध्ये वाटून दिले. परंतू भरताला विश्व विजेता बनून चक्रवर्ती व्हायचे होते. त्यामुळे भरताने आपल्या भावांना त्यांचे राज्य त्याचा राज्यात समाविष्ट करण्यास सांगितले. ९८ भावांनी आपले राज्य भरताला देऊन टाकले आणि जैन दीक्षा घेतली. पण बाहुबली नी त्याला नकार कळविला आणि युद्ध करण्यास सांगितले. या दोघांमधील युद्धामुळे बरीच मनुष्यहानी होईल म्हणून त्यांचा मंत्रानी त्यांना आपपसात तीन युद्ध करण्याचा सल्ला दिला. त्यामध्ये द्दष्टि युद्ध, जल युद्ध, आणि मल्ल युद्ध करण्यास सांगितले. हे युद्ध बाहुबलीनी जिंकले. पण त्यांना वाटू लागले की मी माझ्या भावाला हरविले आणि राज्य जिंकले. त्यामुळे त्यांना संसार नकोशा वाटू लागला व त्यांना वैराग्य मिळाले. त्यांनी सर्व राजवैभव भरतास दिले आणि ते मुनि बनले. अनेक वर्ष राज्य करून भरत राजा हा चक्रवर्ती राजे बनले. परंतू त्यांनी राज्य आपल्या मुलाला सोपवून जैन मुनीची दीक्षा घेतली

आणि मोक्ष प्राप्त केला. चक्रवर्ती भरत राजा च्या नावावरून या देशाला भारतवर्ष असे नाव पडले. भगवान बाहुबली चा धार्मिक स्थळाच्या बद्दल जाणून घेऊया.





१) श्री श्रवणबेळगोळ क्षेत्र

श्री श्रवणबेळगोळ क्षेत्र हे भारतामधील कर्नाटका राज्यातील हसन जिल्हा मधील विध्यंगिरी व चंद्रगिरी डोंगरा मध्ये वसलेले प्रसिध्द जैन तीर्थ क्षेत्र आहे. तिथे श्री गोमटेश्वर बाहुबली ची ५८ फुट उंच मुर्ती असून ही मुर्ती विध्यंगिरी डोंगरावर आहे. हि मुर्ती ग्रेनाइट चा विशाल असा अखण्ड दगडापासून बनवली आहे. याचे निर्माण गंगा वंश चे मंत्री आणि सेनापती चामुण्डराय ने बनविले. २५ किलोमीटर अंतरावरून ही या मुर्तीचे दर्शन होते. विध्यंगिरी डोंगरावर ओडेगल बसदी ही सर्वा त मोठी बसदी आहे. या बसदीचे नाव ओडेगा म्हणजेच मंदिराच्या भिंती बळकट करण्यासाठी वापरल्या जाणारा साबणाच्या दगडावरून पडले आहे. या मंदिरात भगवान ऋषभनाथ, भगवान नेमिनाथ आणि भगवान शांतीनाथ यांची प्रतिमा आहे. चंद्रगिरी डोंगरा मध्ये चंद्रगुप्त बसदी, चामुंडराय बसदी, पार्श्वनाथ बसदी, आणि कट्टले बसदी आहे. चंद्रगुप्त बसदी स्थापना ९ व्या शतकात झाली. या मंदिराच्या मधल्या कक्षात भगवान पार्श्वनाथाची आकृती उजवीकडे पद्मावती आकृती आणि डावीकडे कुष्मांडिनीची आकृती बसलेल्या अवस्थेत आहेत. चामुंडराय बसदी भगवान नेमिनाथांना समर्पित आहे. पार्श्वनाथ बसदीमध्ये १८ फूट अखंड भगवान पार्श्वनाथांची विशाल प्रतिमा आहे. कट्टले बसदीमध्ये चौरीवाहकांसह भगवान ऋषभनाथांची मुर्ती आहे.







२) श्री बाहुबली

बाहुबली हे जैन तीर्थक्षेत्र आहे . ते महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हातील हातकणंगले तालुक्यात कुंभोज गावाजवळ आहे. तेथे १९६३ मध्ये कायोत्सर्ग मुद्रातील बाहुबलींची २८ फुट उंच मुर्ती उभारण्यात आली .





३) करकला

येथे भगवान बाहुबलीची ४२ फुट उँच अखण्ड प्रतिमा १४३२ मध्ये बनविली आहे. भगवान बाहुबलीची ४२ फुट उँच अखण्ड प्रतिमा करकला मधील एका पर्वताच्या टेकडीवर बनविली आहे. करकला हे ठिकाण कर्नाटक मध्ये आहे.



४) श्री धर्मस्थळ

धर्मस्थळ मध्ये भगवान बाहुबली ची ३९ फुट उँच प्रतिमा एक १३ फुट उँच वेदी वर विराजमान आहे. प्रतिमेचे वजन १७५ टन आहे. हे कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्हातील बेलथंगडी तालुकातील धर्मस्थळ या गावामध्ये आहे.



५) वेन्नूर

वेन्नूर हे कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्हातील गुरूपूर नदी चा किनारावर वसलेले शहर आहे. वर्ष १६०४ मध्ये भगवान बाहुबली ची ३८ फुट उँच प्रतिमा

चे निर्माण केली होती . याची रचना श्री श्रवणबेळगोळ मधील भगवान बाहुबलीचा प्रतिमा सारखी आहे .



६) गोमटगिरी

गोमटगिरी हे कर्नाटकातील म्हैसूर जिल्हातील हुंसूर तालुक्यातील बिलिकेरे येथे वसलेले गाव आहे . हे एक प्रसिद्ध जैन स्थळ आहे . भगवान बाहुबली ची ७००

वर्ष जुनी मूर्ती श्रावण गुड्डा नावाच्या ५० मीटर उंच टेकडीवर उभी आहे. ही २० फुट उँच प्रतिमा श्री श्रवणबेळगोळ मधील भगवान बाहुबलीचा प्रतिमा सारखी आहे.




३. श्री सम्मेद शिखरजी क्षेत्र

श्री सम्मेद शिखरजी ला पारसनाथ पर्वत असे ही म्हणतात. हे जैन धर्मियांसाठी सर्वात पवित्र तिर्थक्षेत्र आहे. हे भारताच्या झारखंड राज्यामधील गिरीडीह जिल्हामध्ये छोटा नागपूर पठारावर असलेल्या १३५० मीटर उंच पर्वतामध्ये वसलेले सगळयात महत्वपुर्ण जैन तीर्थ क्षेत्र आहे. तिथे २४ तिर्थंकरांचे पादुका आहेत. येथे २४ पैकी २० तिर्थंकराना मोक्ष प्राप्ती झाली आहे.

येथे प्रत्येक तिर्थंकराच्या काळया किंवा पांढरा संगमरवरी रंगाच्या ३१ टोंकावर पावलांचे ठसे आहेत. पार्श्वनाथांनी ज्या डोंगरमाथ्यावर मोक्ष प्राप्त केला त्याला सुवर्णभद्र कू म्हणतात आणि श्री सम्मेद शिखरजीवरील पवित्र टेकडी मानली जाते. या शिखरावर पार्श्वनाथ टोंक बांधण्यात आला आहे. हे मंदिर दोन मजल्याचे असून वरच्या मजल्यावर पार्श्वनाथांचे टोंक आहे, तर खालच्या मजल्यावर पार्श्वनाथांच्या चेहराची भगव्या रंगाची प्रतिकृती आहे.







श्री सम्मेद शिखरजीवर ३१ टोंक असून ते खालील प्रमाणे आहेत .

नंबर	टोंक
१	गौतम गणधर स्वामी
२	कुंथुनाथ
३	ऋषभा
४	चंद्रप्रभा
५	नमिनाथ
६	अरहनाथ
७	मल्लिनाथ
८	श्रेयांसनाथ
९	पुष्पदंता
१0	पद्मापप्रभा
११	मुनिसुव्रतनाथ
१२	चंद्रप्रभा
१३	ऋषभा
१४	अनंतनाथ
१५	शीतलता

१६	सम्भवनाथ
१७	वासुपुज्य
१८	अभिनंदन
१९	गणधारा
२०	जलमंदिर
२१	धर्मनाथ
२२	महावीर
२३	वरीसेन
२४	सुमतिनाथ
२५	शांतिनाथ
२६	महावीर
२७	सुपार्श्वनाथ
२८	विमलनाथ
२९	अजितनाथ
३०	नेमिनाथ
३१	पार्श्वनाथ



टोंक १ ः श्री गौतम स्वामी



टोंक २ः भगवान कुंथुनाथ


टोंक ३१ शाश्वत जिन
श्री ऋषभनान प्रभू


टोंक ४१ शाश्वत
जिन चंद्रप्रभा


टोंक ५६ श्री
नमिनाथ प्रभू
(२१ वे तीर्थंकर)


टोंक ६६ श्री अरनाथ
प्रभू (१८ वे तीर्थंकर)


टोंक ७: भ. मल्लिनाथ
१९ वे तीर्थंकर


टोंक ८: श्रेयांसनाथ
प्रभू (११ वे तीर्थंकर)


टोंक ९: भगवान
सुविधिनाथ


टोंक १0: श्री पदम प्रभू (सहावे तीर्थंकर)


टोंक ११ः श्री मुनीसुव्रत प्रभू (२० वे तीर्थंकर)


टोंक १२ः श्री चंद्रप्रभू (आठवे तीर्थंकर)



टोंक १३ : श्री आदिनाथ प्रभू (प्रथम तीर्थंकर)



टोंक १४ : अनंतनाथ प्रभू (१४ वे तीर्थंकर)


टोंक १५ः शीतलनाथ
प्रभू (दहावे तीर्थंकर)


टोंक १६ः श्री संभवनाथ प्रभू
(तिसरे तीर्थंकर)



टोंक १७ः श्री
वासुपूज्य प्रभू
(१२ वे तीर्थंकर)



टोंक १८ ः अभिनंदन प्रभू (चौथे तीर्थंकर)



टोंक १९ः श्री शुभ स्वामी गणाधर



टोंक २० ः जल मंदिर


टोंक २१ ः श्री धर्मनाथ
प्रभू (१५ वे तीर्थंकर)


टोंक २२ः शाश्वत जिन
श्री वर्धमान प्रभू


टोंक २३ ः शाश्वत जिन श्री
वरिषेण प्रभु


टोंक २४ ः सुमतीनाथ
प्रभू (पाचवे तीर्थंकर)


टोंक २५ः शांतीनाथ प्रभू
(सोळावे तीर्थंकर)



टोंक २६ः श्री महावीर प्रभू
(२४ वे तीर्थंकर)


टोंक २७ः श्री सुपार्श्वनाथ प्रभू (सातवे तीर्थंकर)




टोंक २८ः श्री विमलनाथ प्रभू (१३ वे तीर्थंकर)






टोंक २९ः अजितनाथ प्रभू (द्वितीय तीर्थंकर)




टोंक ३०ः श्री नेमिनाथ प्रभू (२२ वे तीर्थंकर)





श्री सम्मेद शिखरजीवर २४ पैकी २0 तिर्थंकराना मोक्ष प्राप्ती झाली आहे असून ते खालील प्रमाणे आहेत .

नंबर	तिर्थंकर	जन्म स्थान	आईचे नाव	वडिलांचे नाव	वैराग्य झाड	चिन्ह
१	भगवान अजितनाथ जी	अयोध्या	विजया	जितशत्रु	सर्पपर्ण	 हत्ती
२	भगवान सम्भवनाथ जी	श्रावस्ती	सेना	जितारी	शाल	 घोडा

३	भगवान अभिनंदन जी	अयोध्या	सिद्धार्था	संवर	देवदार	 माकड
४	भगवान सुमतिनाथ जी	विनीतापूर	सुमंगला	मेघरथ	प्रिंयगु	 चकवा
५	भगवान पदम्प्रभ जी	कौशंबीपूर	सुसिमा	धारणाराजा	प्रिंयगु	 कमळ
६	भगवान सुपार्श्वनाथ जी	काशीनगरी	पृथ्वी	सुप्रतिष्ठ	शिरीष	 स्वस्तिक
७	भगवान चंद्रप्रभ जी	चंद्रपुरी	लक्ष्मणा	महासेन	नागतरू	 चंद्र
८	भगवान सुविधिनाथ जी	काकंधीपुरी	जयरामा	सुग्रीव	शालवृक्ष	 मगर

९	भगवान शीतलनाथ जी	भद्रिलापूर	सुनंदा देवी	दृढरथ राजा	कलाश	 वृक्ष
१०	भगवान श्रेयांसनाथ जी	सिंहपूरी	विष्णुश्री (नंदा)	विष्णुराज (विमल)	तिंदुक	 गेंडा
११	भगवान विमलनाथ जी	कांपिल्य	आर्यशर्मा	कृतवर्मा	जंबू	 डुक्कर
१२	भगवान अनंतनाथ जी	आयोध्या	लक्ष्मीमती	सिंहसेन	पिंपळ	 सायाळ
१३	भगवान धर्म नाथ जी	रत्नपुरी	सुप्रभा	भानुराज	दिर्घपर्ण	 वज्र

१४	भगवान शांतिनाथ जी	हस्तिनापूर	ऐरादेवी	विश्वसेन	नंदीतरू	 हरीण
१५	भगवान कुंथुनाथ जी	हस्तिनापूर	श्रीदेवी	सुरसेन	तिलक	 बकरा
१६	भगवान अरहनाथ जी	हस्तिनापूर	मित्रसेना	सुदर्शना	आम्र	 मासा (मीन)
१७	भगवान मल्लिनाथ जी	मिथीलापुरी	प्रभावती (रक्षता)	राजकुंभ	अशोक	 कुंभ
१८	भगवान मुनिसुव्रतनाथ जी	कुशाग्रपूर	सोमा	सुमित्र	चंपक	 कासव
१९	भगवान नमिनाथ जी	मिथीलापुरी	वर्मिला	विजयराज	बकुल	 निलकमल

२०	भगवान पार्श्वनाथ	वाराणसी किंवा काशी	वामादेवी	विश्वसेन	धवल	 सर्प

४ . जैन धार्मिक स्थळे

१) श्री पावापुरी क्षेत्र (महावीर निर्वाण स्थल)

श्री पावापुरी क्षेत्र हे राजगीर आणि बोधगया च्या जवळ भारताच्या बिहार राज्याचा नालंदा जिल्हा मधील शहर आहे . हे शहर कैमूर पर्वतामध्ये वसलेले आहे . येथे भगवान महावीर यांना मोक्ष प्राप्ती झाली आहे . येथील जलमंदिर हे प्रसिध्द मंदिर आहे .



२) श्री मांगी-तुंगी

मांगी-तुंगी हे जैन तीर्थक्षेत्र आहे. ते महाराष्ट्रातील नाशिक जिल्हातील सटाणा तालुक्यात भिलवड गावाजवळ आहे. तेथे जैन धर्मीयांचे पहिले तिर्थंकर श्री ऋषभदेव जी (श्री आदिनाथ जी) यांची १०८ फुट उंच मुर्ती आहे. मांगी व तुंगी या दोन्ही टेकडयावर अनेक मूर्ती खडकांवर कोरलेल्या आहेत. यक्ष आणि यक्षिणी (तिर्थंकरांचे सेवक) आणि इंद्र यांचे सुंदर आणि आकर्षक दगडी कोरीव काम येथे

पहावयास मिळते. आदिनाथ व शांतीनाथ लेणी या दोन मुख्य लेण्यांमध्ये आदिनाथ गुहेत १३४२ चा शिलालेख आढळतो. भगवान शितलनाथ, भगवान महावीर, भगवान आदिनाथ, भगवान शांतीनाथ, भगवान पार्श्वनाथ, रत्नात्रेय अशा देवता आणि ऋषीमुनींच्या नावे अनेक लेणी आहेत. डोंगराच्या पायथ्याशी ७५ हून अधिक मुर्ती असलेली तीन मंदिरे आहेत. पद्मासन मुद्रामध्ये भगवान मुनीसुव्रतनाथांचा कोलोसस आहे. तुंगी टेकडीवर भगवान चंद्रप्रभूंवर दोन लेणी, आठवी तीर्थंकर आणि दुसरी रामचंद्र गुहा आहे. चंद्रप्रभू गुहेत ३.३ फूट उंचीची मुर्ती कोरलेली आहे. मांगी टेकडीवर १० लेणी आहेत. महावीर गुहेत पद्मासन अवस्थेत पांढरा ग्रॅनाईटची तीर्थंकर महावीरांची मुर्ती आहे. गुहा ६ मध्ये भगवान पार्श्वनाथाची मुख्य मुर्ती आहे. त्याच्या शेजारी आदिनाथाच्या प्रतिमा आहेत.




मांगी टेकडीवर ७ जुनी मंदिरे आहेत. मांगी टेकडीवर मुख्य मंदिर भगवान महावीर यांना समर्पित आहे. मुलनायक पद्मासन मुद्रातील भगवान महावीरांची ३.३ फुट उंचीची मुर्ती आहे. गुहा नंबर ६ मध्ये भगवान आदिनाथांची ४.६ फुट उंचीची मुर्ती आहे. तेथेच पद्मासन मुद्रातील २० मुर्ती आहेत. भगवान पार्श्वनाथ हे मंदिराच्या मध्यभागी आहेत. गुहा नंबर ६ मध्ये तीन बाजूंना ४७ मुर्ती असून येथे मध्यभागी भगवान पार्श्वनाथांची २.१ फुट उंचीची मुर्ती आहे. टेकडीच्या भिंतीवर २४ तिर्थंकाराचे शिल्प आणि या टेकडीवरून मोक्ष प्राप्त करणारा जैन संतांच्या चरण

प्रतिमा आहेत. असा प्रकारे तेथे भरपूर गुहा असून त्यामध्ये जैन तिर्थंकाराचे प्रतिमा आहेत.









३) श्री गिरनार

गिरनार हे जैन तीर्थक्षेत्र आहे.ते गुजरातातील जुनागढ जिल्हातील जुनागढजवळील गिरनार पर्वतावर वसलेले आहे. तेथे जैन धर्मीयांचे श्री भगवान नेमिनाथ जी यांचे भव्य व संपन्न देवालय आहे. श्री भगवान नेमिनाथ यांना अरिष्टनेमी देखील म्हणतात. ते जैन धर्मीयांचे २२ वे तिर्थंकर आहेत. तेथे प्राचीन राजवाडयाचे जैन मंदिर आहे. श्री भगवान नेमिनाथांची काळया पाषाणाची अतिशय सुंदर आणि सुबक मुर्ती आहे. पुढे गेल्यावर जैनांचे पहिले तिर्थंकर आदिनाथांची भव्य प्रतिमा आहे. येथे उत्तम कलाकुसर केलेल्या जैन मंदिरांचा समूह आहे.

श्री भगवान नेमिनाथ यांच्या लग्नाचा मेजवानीसाठी कत्तल करण्यासाठी बांधलेले प्राणी रडत आहेत आणि सोडण्यासाठी ओरडत आहेत हे पाहिल्यानंतर ते तपस्वी झाले. हे पाहून त्यांच्या लक्षात आले की आपल्या लग्नामुळे हजारो प्राणी मारले जाणार आहेत. त्यांनी सर्व सांसारिक सुखांचा त्याग केला व मोक्षप्राप्तीसाठी गिरनार पर्वतावर गेले. गिरनार पर्वताच्या सर्वोच्च शिखरावरून त्यांनी सर्वज्ञान आणि मोक्ष (निर्वाण) प्राप्त केले.







४) श्री कुंथलगिरी

कुंथलगिरी हे जैन तीर्थक्षेत्र महाराष्ट्रात आहे.ते महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हातील भूम तालुक्यात आहे. तेथे ११ मंदिरे आहेत. तिथे मुनिश्री देशभुषण व कुलभुषण यांची भव्य मंदिरे आहेत. तिथे मुनिश्री देशभुषण व कुलभुषण या दोन्ही भावानी मोक्ष प्राप्त केला. येथे भगवान नेमिनाथ व भगवान बाहुबली यांची कायोत्सर्ग मध्ये असलेली प्रतिमा आहे. भगवान बाहुबली यांची १७ फूट उंच मुर्ती आहे. येथे प्रथमाचार्य आचार्य शांतीसागर महाराज यांची समाधी आहे. तिथे भव्य भगवान शांतीनाथ मंदिर, भगवान आदिनाथ मंदिर, भगवान अजितनाथ मंदिर, नंदिश्वर मंदिर आहेत. तसेच डोंगराच्या पायथ्याशी भगवान नेमिनाथ, भगवान महावीर, रत्नत्रय पंचमेरू, व समवसरण मंदिरे आहेत. येथे वृषभसागर महाराज

यांनीही येथे समाधी घेतली आहे. येथे १३.११ मीटर उंचीचा मानस्तंभ असून या स्तंभामध्ये ध्यानस्थ बसलेले सर्वतनाथ यांच्या चार मुर्ती आहेत.







५) श्री जैन तीर्थ स्थळ गोपाचल पर्वत ः

गोपाचल पर्वत हा ग्वालियर मध्ये आहे. ग्वालियर चा प्रसिध्द किल्ला मध्ये असलेला हा पर्वत आहे. येथे सन १३९८ ते सन १५३६ मध्ये जैन तिर्थंकराचां मुर्ती कोरून बनिवला आहेत. या विशाल मुर्तीचे निर्माण कार्य तोमरवंशी राज वीरमदेव, कीर्तीसिंह यांच्या काळात बनिवला आहेत. तिथे भगवान पार्श्वनाथांची ४२ फूट विशाल पद्मासनातील उंच मुर्ती आहे.







६) श्री जैन तीर्थ स्थळ द्रोणगिरीः

मध्यप्रदेश मधील छतरपूर जिल्हामधील विजापूर तालुकामधे द्रोणगिरी जैन तीर्थ स्थळ पर्वतावर आहे. तेथे जाण्यासाठी २३२ पायरी चढावी लागते. तेथे पार्श्वनाथांचे अद्भुत असे मंदिर आहे.



Bhagwan Parshvanath Dronagiri



७) श्री जैन लाल मंदिर ः

श्री दिगंबर जैन लाल मंदिर हे दिल्लीमधील सर्वात जूने आणि प्रसिद्ध जैन मंदिर आहे. चांदणी चौक परिसरात लाल किल्ल्याचा समोर हे मंदिर आहे. हे मंदिर १६५६ मध्ये बांधले गेले आहे. या मंदिरामध्ये भगवान पार्श्वनाथ आहेत. या मंदिराला १९३१ मध्ये आचार्य शांतीसागर महाराजांनी भेट दिली होती.





८) श्री भगवान पार्श्वनाथ जैन मंदिर ः

श्री १००८ भगवान पार्श्वनाथ जैन मंदिर अतिशय क्षेत्र कंगणपूर (कोगनोळी) हे महाराष्ट्रातील सांगली जिल्हातील कवठे महांकाळ तालुकामध्ये आहे. या गावामध्ये एकही जैन समाजाचे घर नाही. सन १९६५ मध्ये घरबांधणीसाठी पांढरा मातीचे खोदकाम सुरू असताना अचानक भूमिगत अवस्थेत ११ व्या शतकातील मुळनायक खडगासन मुद्रेतील श्री १००८ भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा व इतर तिर्थंकराच्या प्रतिमा मिळाल्या. भगवान पार्श्वनाथांचा प्रतिमावर कन्नड शिलालेख आहे. तेथे भगवान शांतीनाथ, भगवान कुंथुनाथ, भगवान अरहनाथ, भगवान मुनिसव्रतनाथ, भगवान वासुपूज्य, आणि भगवान नेमीनाथ याचां भव्य मुर्ती स्थापन केल्या आहेत.









९) श्री अंतरिक्ष भगवान पार्श्वनाथ जैन मंदिर ः

महाराष्ट्रातील वाशिम जिल्हामधील शिरपूर गावात श्री अंतरिक्ष भगवान पार्श्व नाथ जैन मंदिर आहे. अंतरिक्ष भगवान पार्श्वनाथांची मुख्य मुर्ती काळया पाषाणाची आहे. ही मुर्ती शिल्पकलेचा उत्तम नमुना असून सुमारे ३.५ फूट उंच आहे. हि विशिष्ट ध्यानमुद्रामध्ये असते ज्याला ध्यानस्थ अर्धपद्मासन म्हणून ओळखले जाते. मुर्तीच्या माथ्यावर नागाचे हुड आहे. असे मानले जाते की पुर्वी ही मुर्ती तरंगत्या स्थितीत होती आणि केवळ एका बिंदूवर जमिनीवर विश्रांती घेण्यासाठी आली आहे ती म्हणजे एका पायाचे लहान बोट. त्या बिंदूवर तिचे संपुर्ण वजन समर्थित आहे. तो एक बिंदू वगळता संपुर्ण मुर्ती तरंगत असते म्हणून त्याला अंतरिक्ष म्हणतात. टेथे पावली दिगमोरी मंदिर, चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर आहे.





१०) श्री नंदगिरी अतिशय क्षेत्र ः

नंदगिरी अतिशय क्षेत्र हे महाराष्ट्रातील सातारा जिल्हामधील किल्ले कल्याणगड, धुमाळवाडी येथे आहे. भगवान पार्श्वनाथांची मुख्य मुर्ती येथे आहे ती एका गुहेत आहे. हे कल्याणगडावर असलेले अतिशय क्षेत्र आहे. येथे तीन तलावाचा संच असून तो मुख्य तलावाशी जोडलेला आहे. मुख्य तलावाचे प्रवेशद्वार अतिशय लहान असून पाण्यात उतरण्यासाठी खाली वाकून जावे लागते. ही गुहा आतून प्रचंड असून काहीशे फूट व्यासाची आहे. पाण्यातून या मुर्तीकडे जावे लागते. या परिसरात एक ही जैन घर नाही.





११) श्री १००८ धर्मनाथ दिगंबर जैन तीर्थक्षेत्र ः

श्री १००८ धर्मनाथ दिगंबर जैन तीर्थक्षेत्र हे महाराष्ट्रातील सांगली जिल्हामधील धर्मगिरी बांबवडे येथे आहे .





१२) श्री १००८ झरी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय तीर्थक्षेत्र ः

श्री १००८ झरी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय तीर्थक्षेत्र हे महाराष्ट्रातील सांगली जिल्हामधील कुंडल येथे आहे. हे एक ऐतिहासिक ठिकाण आहे.त्याचे प्राचीन नाव कौंदिन्यपूर होते. येथे भगवान पार्श्वनाथांची तीन मंदिरे आहेत, ती म्हणजे कलिकुंड पार्श्वनाथ, श्री १००८ झरी पार्श्वनाथ आणि श्री गिरी पार्श्वनाथ.

श्री १००८ झरी पार्श्वनाथाच्या मूर्तीला झरी पार्श्वनाथ म्हणतात कारण की वर्षभर मूर्ती च्या पायाजवळ पाणी वाहते. याजवळच पद्मावती देवीची सुंदर चार भुजा असलेली मूर्ती स्थापित आहे. श्री गिरी पार्श्वनाथ मंदिर हे प्राचीन मंदिर पठारावर वसलेले आहे. हे पठार तपोभूमी म्हणून ओळखळे जाते. येथे भगवान पार्श्वनाथांची १ मीटर उंच मूर्ती आहे.







कलिकुंड पार्श्वनाथ





गिरी पार्श्वनाथ



१३) श्री १००८ दिगंबर जैन अतिशय तीर्थक्षेत्र कुंथुगिरी ः

श्री १००८ दिगंबर जैन अतिशय तीर्थक्षेत्र महाराष्ट्रातील हातकणंगले जिल्हामधील कुंथुगिरी येथे आहे. डोंगरावरती २४ तिर्थकरांचे टोक आहेत. डोंगराच्या पायथ्याशी भगवान पार्श्वनाथांची ९ फूट उंचीची १०८ सापांची मुर्ती आहे.



१४) श्री चंपापूर दिगंबर जैन सिद्ध तीर्थक्षेत्र ः

श्री चंपापूर दिगंबर जैन सिद्ध क्षेत्र हे बिहार मधील नाथनगर, भागलपूर येथे आहे. चंपापूर हे जगातील एकमेव पंचकल्याणक क्षेत्र आहे. हे गर्भ, जन्म, तप, ज्ञान, आणि मोक्ष या पंचकल्याणकाशी संबंधित आहे. भगवान महावीराच्या दीक्षाकाळ, धार्मिक प्रचार केंद्र याचा चंपापूरशी संबंध आहे. सर्व २४ तीर्थंकरांच्या समवशरण मुळे चंपापूरला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. येथील मुख्य मंदिर सुमारे २५00 वर्ष प्राचीन आहे.





१६) बदामी जैन मंदिरे ः

बदामी हे कर्नाटकात असून. तेथे भरपूर गुहा असून या गुहेत जैन मंदिर आहेत. येथील गुहेत भगवान पार्श्वनाथ, भगवान बाहुबली, भगवान महावीर यांच्या प्रतिमा आहेत. तसेच एका गुहेत ८ फूट उंचीची भगवान आदिनाथाची मूर्ती असून त्याभोवती २४ तीर्थंकर असून यक्ष व यक्षीच्या प्रतिमा आहेत.

















१६) श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र ः

श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे मध्यप्रदेशातील रायसेन जिल्हातील भोजपूर येथे आहे. याला उत्तर भारत चे सोमनाथ ही म्हणतात. तेथे भगवान शांतीनाथ यांची २१ फूट उंच उभ्या मुद्रातील प्रतिमा आहे. इ.स. ११०० मध्ये तिची पूजा करण्यात आली. ही राज भोज चा काळात स्थापण करण्यात आली असा उल्लेख आहे.

हे क्षेत्र प्रसिद्ध भक्तामर स्तोत्राचे लेखक आचार्य मानतुंग यांच्याशी संबंधित आहे. आचार्य मानतुंग यांचे तपश्चर्यास्थान, सिद्धशिला आणि त्यांचे देवस्थानही येथेच आहे.







१७) खजुराहो येथील जैन मंदिर ः

खजुराहो येथील जैन मंदिरांपैकी भगवान अदिनाथ मंदिर, भगवान पार्श्वनाथ मंदिर, भगवान शांतीनाथ मंदिर,घंटाई मंदिर सर्वात महत्वाची मंदिरे आहेत .

अ) भगवान पार्श्वनाथ मंदिर

हे भगवान पार्श्वनाथ मंदिर असून इ.स. ९४५ चा एक शिलालेख आहे.या मंदिरात प्राचीन जादूचा चौक आढळतो त्याला चौतिसा यंत्र असे संबोधले जाते.

आ) भगवान अदिनाथ मंदिर

हे भगवान अदिनाथ मंदिर असून इ.स. १०२७ चा एक शिलालेख असलेली मुर्ती आहे. ही मुर्ती डोक्यावर उष्निशा असलेले आदिनाथ भगवान आणि लहान बैलाची आकृती असलेले धर्मचर्क आहे.

इ) भगवान शांतीनाथ मंदिर

भगवान शांतीनाथ मंदिर हे एक आधुनिक संमिश्र रचना आहे.ज्यात अनेक मंदिरांचे विभाग समाविष्ट आहेत आणि अनेक मंदिरे आहेत. मुख्य विभागात भगवान शांतीनाथांची १५ फूट मुर्ती असून त्यावर १०२८ चा शिलालेख आहे.

ई) घंटाई मंदिर

घंटाई मंदिर हे इ.स. ९६० च्या सुमारास बांधले. या मंदिरात ९ ग्रह आणि गोमुख यक्षासह चकरेश्वरी चे दर्शन होत असल्याने हे मंदिर आदिनाथ भगवान यांना समर्पित आहे.













